ॐ

# ।। गीता फाऊंडेशन ।।

(यतन्तश्च दृढव्रता:)

'चैतन्य', लोकमान्य सोसायटी, पंढरपूर रोड,मिरज - ४१६ ४१०.

फोन : (०२३३) २२३२०८२ मोबाईल : ९८६००३२०८२ E-mail : geetafoundation@gmail.com

## पत्रद्वारा श्रीमद् भागवत अभ्यास

श्रीमद्‌भागवतात एक प्रसंग आहे. सात दिवसांचेच आयुष्य शिल्लक असलेल्या राजा परीक्षिताला श्री शुकाचार्य भागवत कथा सांगण्यासाठी आले असता, देव अमृत कलश हातात घेऊन आले व शुकाचार्यांना म्हणाले, 'गुरुदेवा! हा अमृत कलश तुम्ही घ्या व राजा परीक्षिताला यातील अमृत द्या म्हणजे त्याचा मृत्यू टळेल व हे भागवत कथामृत आम्हाला द्या !'. ते ऐकताच शुकाचार्य हसून देवांना म्हणाले, 'कुठे तुमचा हा अमृत कलश व कुठे हे आत्म्याला परमात्मा बनवणारे भागवत कथामृत'. बिचारे देव निराश होऊन परत गेले. देवांना शुकाचार्यांनी भागवत कथामृत दिले नाही कारण मनुष्याला अमर करणाऱ्या अमृतापेक्षा भागवत कथामृताची महती जास्त होती.

श्री भगवंताच्या अहेतुक कृपेमुळे जीवाला मनुष्य जन्म मिळतो. या जन्म-मरणाच्या फेऱ्यातून मुक्ती मिळवण्यासाठी कलियुगात कोणालाही आचरता येण्यासारखा उपाय महर्षी वेद व्यासांनी सांगितला आहे तो असा -

निगमकल्पतरोर्गलितं फलं शुकमुखादमृतद्रवसंयुतम् ।

पिबत भागवतं रसमालयं मुहुरहो रसिका भुवि भावुका: ।।

अर्थ : अहो, भूतलावरील भक्तीरसात डुंबू पाहणाऱ्या भाविकांनो ! ही भागवताची भक्तिरसामृत देणारी पाणपोई घातली आहे. या ! जन्मभर हा अमृतरस वारंवार पीत रहा. वेदरूप कल्पवृक्षाच्या पूर्ण पिकून पडलेल्या फळातील हा अमृत रस आहे. वैराग्य संपन्न असलेल्या आचार्यात अग्रगण्य असलेल्या श्री शुकाचार्यानी याची गोडी स्वत: चाखून हे भागवतामृत स्वर्गातील अमृताहून श्रेष्ठ असल्याची ग्वाही आपल्याला दिलेली आहे.

श्रीमद्‌भागवत ही परमात्म्याची वाङ्मयीनमूर्ती आहे. भगवान श्री गोपालकृष्णांनी जेव्हा लौकिकदृष्ट्या भूलोकातून परमधामात जाण्याचे ठरविले तेव्हा त्यांचा परमभक्त असलेल्या उद्धवांनी त्यांना विचारले, 'भगवन् ! आपण अंतर्धान पावल्या नंतर (कलियुगात) आपला वियोग झालेले (सज्जन) भक्त या ठिकाणी कुणाच्या आराधाने राहू शकतील ? त्यांच्यासाठी आपण काही तरी विचार करावा.' भगवंत श्री गोपालकृष्णांनी विचार केला व कलियुगात आपल्या भक्तांसाठी संसार सागरातून मुक्ती मिळवण्यासाठी, सुलभ साधन दिलेच पाहिजे असा निश्चय करून त्यांनी 'श्रीमद्‌भागवतात प्रवेश केला व आपले तेज भागवतात स्थापन केले.' या ग्रंथात ज्ञान, वैराग्य व भक्ती यांनी युक्त असा मुक्तीचा मार्ग प्रतिपादन केलेला आहे. अशा या श्रीमद्‌भागवताचा अभ्यास करणारा मनुष्य खात्रीने मुक्त होतो.

अशा या परम पवित्र ग्रंथाचा पत्रद्वारा अभ्यास करण्यासाठी गीता फाऊंडेशनने एक योजना

तयार केली आहे. परीक्षा म्हटली की माणूस मन लावून अभ्यास करतो. या मनुष्य स्वभावाचा विचार करून गीता फाऊंडेशनने श्रीमद्‌भागवताच्या प्रत्येक स्कंधावर एक प्रश्नपत्रिका तयार केली आहे. ती आपण घर बसल्या सोडवून श्रीमद्‌भागवताचा अभ्यास करू शकता.

अभ्यासक्रम चार वर्षांचा आहे. त्याची रूपरेषा साधारणपणे अशी आहे –

१) प्रथम वर्ष – स्कंध १, २ व ३ अभ्यास. यात प्रत्येक स्कंधावर एक १०० मार्कांची प्रश्नपत्रिका असेल. साधारणपणे प्रत्येक स्कंधाचा अभ्यास करून प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी आपल्याला तीन महिने एवढा मोठा कालावधी मिळेल. अशा प्रकारे पहिल्या वर्षी स्कंध १ ते ३ आपले आरामात अभ्यासून होतील.

२) द्वितीय वर्ष – स्कंध ४, ५, ६ व ७ यातील प्रत्येक स्कंधावर आधारित १०० मार्कांची एक प्रश्नपत्रिका सोडवून त्या त्या स्कंधांचा अभ्यास होईल.

३) तृतीय वर्ष– स्कंध ८, ९ १० (पूर्वार्ध व उत्तरार्ध). या वर्षातही प्रत्येक स्कंधावर आधारित १०० मार्कांची एक प्रश्नपत्रिका सोडवून अभ्यास होईल.

४) चतुर्थ वर्ष – स्कंध ११ व १२ या वर्षात फक्त दोन स्कंधांवर आधारित प्रश्नपत्रिका सोडवून अभ्यास सफल संपूर्ण होईल.

५) अशा प्रकारे प्रत्येक स्कंधावरील प्रश्न पत्रिका सोडवून झाल्यावर शेवटच्या सहा महिन्यात संपूर्ण भागवतावर एक प्रश्नपत्रिका सोडवून त्यानंतर आपणांस प्रमाणपत्र/पदवी प्रधान करण्यात येईल.

प्रश्नपत्रिका घरी बसून आपल्या सोयीने, सवडीने सोडवायच्या असल्याने परीक्षेचा ताण वाटणार नाही. आपण आनंदात हा अभ्यासक्रम पूर्ण करू शकाल असा विश्वास गीता फाऊंडेशनला निश्चित आहे.

या अभ्यासासाठी गीता प्रेस, गोरखपूर यांचे सरल मराठीत अनुवादित केलेले श्रीमद्‌भागवत महापुराणाचे दोन खंड आपल्याला उपयुक्त होतील. हे खंड मिळण्याविषयीची माहिती गीता फाऊंडेशनमार्फत आपल्याला मिळू शकेल.

पत्रद्वारा भागवत अभ्यास म्हणजे केवळ प्रश्नपत्रिका सोडवणे नसून–अर्जुन आणि राजा परीक्षित या दोघांनी जे अभयपद प्राप्त केले. तो प्रवास करणे अपेक्षित आहे.

सोबत पत्रद्वारा श्रीमद्‌भागवताचे आवेदन पत्र जोडले आहे, ते कृपया गीता फाऊंडेशनकडे भरून पाठवावे. या अभ्यासक्रमासाठी गीता फाऊंडेशन कोणतेही शुल्क आकारात नाही. हा अभ्यासक्रम नि:शुल्क आहे. **अभ्यासक्रम १ ऑगस्ट २०१२ पासून सुरू होत आहे.** तरी आवेदन पत्र त्यापूर्वी भरून पाठवावे ही विनंती.

धन्यवाद ! श्रीकृष्ण शरणं मम ।

आपला सुहृद

**आपटे**

**(गीता फाऊंडेशन, मिरज)**

# पत्रद्धारा श्रीमद्भागवत अभ्यास

## आवेदन पत्राचा नमुना

।। ॐ श्रीपरमात्मने नमः ।।

## आवेदन पत्र

दिनांक :

प्रति,

**गीता फाऊंडेशन,**

चैतन्य, लोकमान्य सोसायटी,

पंढरपूर रोड, मिरज–४१६४१०.

जि. सांगली (महाराष्ट्र राज्य)

**विषय : पत्रद्धारा श्रीमद्भागवत अभ्यास.....**

महोदय,

मी पत्रद्धारा श्रीमद्भागवत अभ्यासक्रमात भाग घेऊन त्या अनुरोधाने प्रश्नपत्रिका सोडवून श्रीमद्भागवताचा अभ्यास करून इच्छितो/इच्छिते.तरी कृपया मला या अभ्यासक्रमात प्रवेश द्यावा ही विनंती.

माझी माहिती खालील प्रमाणे –

१) संपूर्ण नांव :..........................................................

२) पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता :..........................................................

..........................................................

३) शैक्षणिक पात्रता :..........................................................

४) सध्याचा व्यवसाय :..........................................................

५) सध्याचे वय :..........................................................

६) यापूर्वी दिलेल्या अध्यात्मिक ग्रंथांच्या परीक्षा :..........................................................

७) घरचा फोन नंबर (एस.टी.डी.कोडसह) :..........................................................

८) मोबाईल नंबर :..........................................................

आपला/आपली अभ्यासार्थी

(अभ्यासार्थीचे नाव व स्वाक्षरी)